दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.२९ ऑगस्ट २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ३५० | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 29 August 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 350 | Pages 4 | Rate 4 Rs

## राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची विश्रांती

**मुंबई**–राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्यात हलका ते मध्यम पाऊस पडत असला तरी, जोरदार पावसासाठी आवश्यक असलेली हवामान प्रणाली सध्या सक्रिय नाही. त्यामुळे दमदार पावसाची शक्यता कमी असून, ऊन आणि पावसाच्या खेळामुळे उकाडा वाढला आहे. समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून, जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.कोकणात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर ओसरला आहे. पुढील ४–५ दिवस हवामान प्रामुख्याने कोरडे आणि दमट राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात, मात्र उष्णतेचा त्रास वाढण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतही पावसाने विश्रांती घेतली असून, पुढील ४–५ दिवस हवामान कोरडे आणि दमट राहण्याचा अंदाज आहे. सध्या या भागासाठी कोणताही विशेष इशारा देण्यात आलेला नाही.

# गणेशोत्सवात प्रसादाची शुद्धता जपा: अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे पालन करा

## मुख्यमंत्र्यांचे मंडळांना आवाहन; रस्ते खड्डेमुक्त ठेवण्याचे आदेश

### नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई

फटाके आणि लाऊडस्पीकरच्या वापरात नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मोठ्या गणेशमूर्तींच्या मिरवणुकीदरम्यान सुरक्षिततेची पुन्हा तपासणी करून मूर्तींची रचना, नट–बोल्ट, वेल्डिंग आणि अन्य जोडण्या मजबूत असल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले.




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचा उत्सव म्हणून साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सव मंडळांना प्रसादाची शुद्धता आणि भाविकांच्या सुरक्षिततेबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. मंडळांनी भाविकांना शुद्ध व भेसळमुक्त प्रसाद मिळेल याची काळजी घेत अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच आवश्यक मार्गदर्शन व प्रशिक्षण घ्यावे, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.गणेशोत्सव–२०२६ मधील कायदा व सुव्यवस्थेच्या तयारीसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उत्सवाचे नियोजन करताना प्रशासन, गणेशोत्सव मंडळे आणि समन्वय समित्यांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबईतील गणेशोत्सव मंडळांनी या उत्सवाला व्यापक स्वरूप दिले असून लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून मांडलेला सामाजिक अभिसरण आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेणे आवश्यक आहे. राज्य उत्सवाचा दर्जा मिळालेल्या गणेशोत्सवाची परंपरा, शिस्त आणि पावित्र्य जपण्याची जबाबदारी प्रशासनासह मंडळे आणि नागरिकांची आहे.

### विसर्जन मार्ग खड्डेमुक्त ठेवण्याचे निर्देश

गणेशमूर्तींच्या आगमन व विसर्जन मार्गांवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या मार्गांवर खड्डे राहू नयेत, रात्री पुरेशी प्रकाशव्यवस्था असावी आणि स्थानिक पातळीवरील अडचणी तातडीने दूर कराव्यात, असे फडणवीस यांनी सांगितले. जुन्या गणेशोत्सव मंडळांच्या परवानग्यांचा प्रश्न प्रलंबित ठेवू नये, अशा सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या.

# कालबाह्य वस्तूंचे होणार जतन पुढच्या पिढीला मिळणार दर्शन

## डाब येथे आदिवासी वस्तू संग्रहालयासाठी सहविचार सभा



दैनिक वादळ वार्ता

**मोलगी । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाची प्राचीन संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती जतन करण्यासाठी डाब (ता. अक्कलकुवा) येथे आदिवासी वस्तू संग्रहालय उभारण्याच्या दृष्टीने सहविचार सभा घेण्यात आली. संग्रहालयात पारंपरिक वास्तू, शेतीची अवजारे, घरगुती वस्तू, वाद्ये, पोशाख, कलावस्तू तसेच पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण व जतन करण्यात येणार आहे.

संग्रहालय केवळ प्रदर्शन केंद्र न राहता आदिवासी इतिहास व संस्कृतीचे ज्ञानकेंद्र ठरावे, यावर बैठकीत भर देण्यात आला. जुन्या वाणांचे जतन करून ते पुढील पिढीला उपलब्ध करून देण्याची सूचनाही करण्यात आली.

बैठकीस डॉ. दिलवरसिंग वसावे, धनसिंग वसावे, सी.के. पाडवी, ड. अभिजित वसावे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कालबाह्य कांगल वाद्य, पारंपरिक भांडी, जात्याचे घटक तसेच बोत, डोवी, डुंगू यांसारख्या वस्तूंचे महत्त्व पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# देगलूर येथील आधार चालू करण्याच्या मागणीसाठी शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने बोंबमारो आंदोलन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । मारोती कुडकेवार**

येथील पोस्ट ऑफीस मधील आधार कार्ड नोंदणी केंद्र गेल्या ४ महीन्या पासून बंद असल्याने नागरिकांची हेळसांड होत असल्याने सदरील केंद्र त्वरित चालू करण्याच्या मागणीसाठी देगलूर येथील पोस्ट समोर शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली बोंबाबोंब बोंबमारो आंदोलन व निदर्शने करण्यात आली याबाबत अधिक माहिती अशी देगलूर तालुक्यातील एकमेव चालू असलेले आधार केंद्र मागील ४ महीन्या पासून बंद असल्याने शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पोस्ट ऑफीस अधिकारी यांना घेराव घालून व नांदेडच्या मुख्य अधिक्षक पाठक, व उपमुख्य अधिक्षक कुलकर्णी यांना निवेदन देऊन आधार केंद्र त्वरित चालू करण्यात यावे अन्यथा पोस्ट ऑफीस समोर निदर्शने धरणे बोंबमारो आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले होते तरीपण



अद्याप पर्यंत आधार केंद्र चालू न झाल्याने दि. २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून पोस्ट ऑफीस समोर निदर्शने व बोंबाबोंब बोंबमारो आंदोलन करण्यात आले यावेळी आधार केंद्र त्वरित चालू करण्यात यावे अशा घोषणा देण्यात आल्या. शैक्षणिक व इतर शासकीय कामांसाठी आधार कार्ड बंधनकारक असल्याने आधार कार्ड नोंदणी करण्यासाठी स्त्री, पुरुष, वृद्ध लहान बालके, सकाळी पाच वाजेपासून सर्व कामधंदा सोडून भुकताण विसरून लाईन मध्ये उभे रहावे लागत होते पण तेही एकमेव आधार केंद्र मागील चार महिन्यांपासून बंद असल्याने शैक्षणिक व शासकीय कामांसाठी आधार नोंदणी करण्यासाठी नागरिकांनी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे बंद असलेले एकमेव आधार कार्ड नोंदणी केंद्र त्वरित चालू करण्यात यावे अशी मागणी करीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पोस्ट ऑफीस समोर तीव्र बोंबाबोंब बोंबमारो आंदोलन व निदर्शने करण्यात आली शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य व माजी उपजिल्हा प्रमुख नागनाथ वाडेकर मुखेडचे तालुका प्रमुख उमेश पाटील आडलूरकर, मष्णाजी पैलावार, विनोद सोनकांबळे, अशोक कांबळे, मानाजी लोणे, लोणीकर, गंगाधर पाटील चाकूरकर, राजु उल्लेवार,हाणमंत राजुरे लख्खेकर, संजय पाटील मंगरुळे लख्खेकर,अशोक मारवाडे कावळगड्डेकर, शिवाजी पाटील, दत्ता राजुरे.शिवाजी चव्हाण, शंकरराव जाधव, अर्जुन लूटे, राजु जाधव आदींसह इतर पदाधिकारी व स्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थितीत होते यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशिक्षण पोलिस निरीक्षक तथा पोलीस उपअधीक्षक यांच्या आदेशानुसार पोलिस उपनिरीक्षक सुर्यवंशी यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता यावेळी पोस्ट ऑफीसर पवार यांनी लवकरच आधार केंद्र चालू करण्याचे आश्वासन दिले.

# तळोद्यात मोबाईल लंपास करणाऱ्या ट्रिपलसिट चोरांच्या मुसक्या आवळल्या

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; ३९ हजारांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**दिपक गोसावी । नंदुरबार**

तळोदा शहरात वृद्ध नागरिक व इतरांना लक्ष्य करून दिवसाढवळ्या मोबाईल जबरीने पळविणाऱ्या तिघांना नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई करत संशयितांकडून मोबाईल व मोटारसायकल असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



१८ ऑगस्ट रोजी तळोदा शहरातील भंसाली प्लाझासमोर ड. मधुकर कलाल यांचा मोबाईल, तर त्याच दिवशी थानेदार गल्ली परिसरात ७३ वर्षीय ज्ञानेश्वर मिस्तरी यांचा मोबाईल ट्रिपलसिट दुचाकीस्वारांनी जबरीने लंपास केला होता. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणाचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेला रोझवा येथील संशयितांचा सहभाग असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संदीप रायसिंग नाईक (२१), युवराज रायसिंग नाईक (२३) आणि धिरेश रमेश नाईक (१९), सर्व रा. रोझवा, ता. तळोदा यांना ताब्यात घेतले.

चौकशीत संशयितांनी मोबाईल चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून चोरीचा मोबाईल व विना नंबरची मोटारसायकल जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे तळोदा पोलीस ठाण्यातील दोन जबरी चोरीचे आणि उपनगर पोलीस ठाण्यातील एक मोटारसायकल चोरीचा गुन्हा असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक अश्विनी सानप व अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिसांच्या या कामगिरीमुळे तळोदा शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शहाद्यातील जनता दरबार सणासुदीमुळे स्थगित

## पाणीपुरवठा व रस्त्यांच्या प्रश्नांवर नगराध्यक्षांचे स्पष्टीकरण

दैनिक वादळ वार्ता

**दिपक गोसावी । नंदुरबार**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मागणीचा विचार करून शहादा शहरातील जनता चौकात २९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेली जनता दरबाराची जाहीर सभा तूर्तास स्थगित करण्यात आली आहे. शहराचे नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, शहरातील पाणीपुरवठा आणि रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नावर नगराध्यक्षांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. सारंगखेडा येथील जॅकवेलवरील जुनी मशिनरी व विद्युत पुरवठ्यातील अडचणींमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पावसामुळे डांबर प्लांट बंद असल्याने रस्ते दुरुस्तीला अडथळे येत असून,



प्लांट सुरू झाल्यानंतर प्रलंबित पॅचवर्क तातडीने करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पाणीपुरवठा व रस्त्यांच्या समस्या लवकर मार्गी लावण्यासाठी नगरपालिका प्रशासन प्रयत्नशील असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष पाटील यांनी केले.

# संपादकीय

## एसटीला 'अच्छे दिन' कधी?



' गाव तिथे एसटी ' हे ब्रीद जपणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाचे अर्थचक्र सध्या बिघडलेले दिसते. मध्यंतरी एसटीच्या ताफ्यात ३६०० नवीन बसगाड्या आल्याचे सांगितले गेले. २५ टक्क्यांची भाडेवाढही झाली; पण उत्पन्नवाढीचे काटे पुढे सरकत नसल्याचे दिसते. नियोजनाचा अभाव व प्रशासकीय पातळीवरील दिरंगाईचा फटका राज्यातील जनतेला बसत आहे.फेब्रुवारी २०२५ मध्ये एसटीचे मासिक उत्पन्न ९०५ कोटी रुपये होते. २५ टक्के भाडेवाढ केल्यानंतर मे २०२६ मध्ये उत्पन्नाचा आकडा ११०० कोटींवर पोहोचणे अपेक्षित होते; पण तिथपर्यंत तो आकडा पोचला नाही. किलोमीटरचा आकडा वाढविण्यासाठी लांब पल्ल्याच्या दिवसाच्या फेऱ्या चालविल्या जात असल्याचे एसटीचे अभ्यासक सांगतात. उदाहरणादाखल सांगायचे तर, एखाद्या जिल्हा ठिकाणाहून तालुकाठिकाणी सकाळच्या फेरीच्या बसमध्ये प्रवासीसंख्या चांगलीच असते; पण परतीच्या प्रवासात ती बस रिकामी धावली तर एकेरी उत्पन्नावर महामंडळ कसे चालणार?काही दिवसांपूर्वी कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) चाळीसगाव रस्त्यावरील औट्रम घाटात बसचा मोठा अपघात थोडक्यात टळला. बसचे स्टेअरिंग घाटातील पहिल्या वळणावर लॉक झाले. बस रस्त्याच्या कडेला गेली. चालकाने कौशल्याने गाडी रस्त्यालगतचा कठडा व झाडावर नेली. चालक व काही प्रवाशांनी संकटकाळी वापरण्याचा दरवाजा उघडला आणि सर्व प्रवासी सुखरूप गाडीबाहेर पडले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिल्लोड आगाराच्या बसचालकाला गाडी चालवतानाच भोवळ आली. प्रसंगावधान राखून त्याने गाडीचा वेग कमी करून गाडी एका बाजूला थांबवली. सुदैवाने अपघात टळला. यातील एका उदाहरणावरून बसगाड्यांची देखभाल नियमितपणे केली जाते की नाही, याची शंका येते. ब्रेक फेल होणे, स्टेअरिंगमध्ये बिघाड आणि देखभालीकडे झालेले दुर्लक्ष यामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागतो. याला कोण जबाबदार ? दुसरे महत्त्वाचे म्हणजे चालक, वाहकांच्या प्रकृतीचा विषयही तितकाच गंभीर आहे. कामाचा ताण, कामासाठीचा वेळ, आरोग्य तपासणी या बाबींकडे होणारे दुर्लक्ष त्यांच्या प्रकृतीवर ताण वाढवणारे आहे.नाशिक विभागात एसटीचे उत्पन्न घटल्याचे लक्षात आल्यानंतर महाव्यवस्थापकांनी अधिकाऱ्यांसोबत इगतपुरी, नाशिक आगारांत पाहणी केली. त्या पाहणीत, लॉगबुक नाही, हजेरीपत्रकात गडबड, प्रवासी सुविधांकडे दुर्लक्ष अशा गोष्टी आढळल्यानंतर ११ अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले. परतवाडा (जि. अमरावती) आगाराचे व्यवस्थापक कामावर असताना मद्याच्या धुंदीत असल्याचे आढळले होते.राज्यातील बहुतांश बसस्थानकांमध्ये प्राथमिक सुविधांचा अभाव आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकतीच छत्रपती संभाजीनगरच्या सिडको बसस्थानकाची पाहणी केली. गलिच्छपणा, अस्वच्छता पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांच्या दौऱ्यानंतर स्वच्छता मोहीम राबविली गेली; पण त्यात सातत्य राहील का? अन्यथा, तात्पुरती स्वच्छता आणि पुन्हा प्रवाशांच्या वाट्याला तुटकी बाकडे, अस्वच्छ स्वच्छतागृहे, उशिराने येणाऱ्या बसगाड्या हेच येत राहील. राज्याचा विचार केल्यास २१ विभाग तोट्यात असल्याचे सांगितले जाते. परिवहनमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना 'उत्पन्न वाढवा अन्यथा कारवाई होईल' असा निर्वाणीचा इशारा दिला आहे. विशेष तपास पथक नेमून प्रत्येक आगाराच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार असल्याचा निर्णय चांगला आहे. वेळेचे योग्य नियोजन, स्वच्छ बसस्थानक, सुरक्षित प्रवास, एसटीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची आर्थिक, आरोग्यविषयक काळजी घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार ही पावले टाकणे गरजेचे आहे. तसे केले तरच एसटीला खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येतील, अन्यथा या जीवनवाहिनीची अवस्था आणखी बिकट होईल.

# भाजप भटके विमुक्त मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भिवंडी लोकसभा मतदारसंघात तब्बल १० हजार वृक्षलागवड

## जनतेचे प्रेम, कार्यकर्त्यांची साथ हीच खरी संपत्ती–माजी आमदार नरेंद्र पवार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



भाजप भटके विमुक्त मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा कल्याण पश्चिमचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भिवंडी लोकसभा मतदारसंघात भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मतदारसंघातील कल्याण पश्चिम, भिवंडी, शहापूर आणि मुरबाड आदी विधानसभा मतदारसंघांमध्ये तब्बल १० हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला आगळ्यावेगळ्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

नरेंद्र पवार यांचा वाढदिवस दरवर्षी कार्यकर्ते, नागरिक तसेच त्यांच्या समर्थकांकडून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मात्र, यंदा पक्षाने त्यांच्यावर सोपवलेल्या महत्त्वाच्या संघटनात्मक जबाबदारीमुळे ते राजस्थानमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी घेता येत नसल्याने कार्यकर्त्यांनी वृक्षलागवडीच्या माध्यमातून त्यांचा वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. मुरबाड विधानसभा मतदारसंघात आमदार किसन कथोरे आणि भाजप पदाधिकारी, भिवंडी विधानसभेत आमदार महेश चौगुले आणि शहापूरमध्ये अशोक इरनक आणि भाजप पदाधिकारी यांच्या, आणि भाजप पदाधिकारी यांच्या तर कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात नरेंद्र पवार फाउंडेशन आणि भाजप पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून हा वृक्षलागवडीचा उपक्रम राबविण्यात आला.

**सध्या राजस्थानमध्ये पार पाडताहेत महत्त्वाची पक्षीय जबाबदारी...**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप पक्षश्रेष्ठींनी नरेंद्र पवार यांच्यावर राजस्थानमधील पाली नगरपरिषद निवडणुकीची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्यानुसार पवार सध्या राजस्थानमध्ये पक्षाच्या संघटनात्मक कामासाठी कार्यरत आहेत.

यापूर्वीही पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जबाबदारी सोपवली होती. केरळमध्ये त्यांनी प्रभावीपणे संघटनात्मक काम करत पक्षाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे आता राजस्थानमध्येही त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**'जनतेचे प्रेम, कार्यकर्त्यांची साथ हीच खरी संपत्ती – माजी आमदार नरेंद्र पवार**

वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल नरेंद्र पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली. जनतेचे प्रेम, कार्यकर्त्यांची साथ, बहिणींचा स्नेह आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद हीच माझी खरी संपत्ती आहे,अशी भावना त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले की, दरवर्षी वाढदिवसानिमित्त सर्वांना भेटण्याचा, त्यांच्या शुभेच्छा स्वीकारण्याचा तसेच रक्षाबंधनानिमित्त बहिणींच्या प्रेमाने आणि आपुलकीने साजरा होणारा स्नेहसोहळा अनुभवण्याचा आनंद मिळतो. मात्र, यावर्षी पक्षाने राजस्थानमधील पाली नगरपरिषद निवडणुकीची महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याने आपण राजस्थानमध्ये कार्यरत असणार आहोत. त्यामुळे वाढदिवसानिमित्त सर्वांच्या भेटीगाठी घेता येणार नाहीत, तसेच रक्षाबंधनाच्या निमित्ताने घरी येऊन प्रेमाने राखी बांधणाऱ्या बहिणींनाही भेटता येणार नाही, याची मनापासून खंत असल्याचे त्यांनी सांगितले.आपण सर्वांनी आजवर माझ्यावर केलेले प्रेम, कार्यकर्त्यांनी दिलेली साथ, बहिणींनी दिलेला स्नेह आणि ज्येष्ठांनी दिलेले आशीर्वाद हेच माझ्यासाठी खऱ्या अर्थाने अमूल्य आहेत. मी प्रत्यक्ष उपस्थित नसलो, तरी आपले प्रेम, स्नेह, विश्वास आणि आशीर्वाद माझ्यासोबत कायम राहतील, हीच माझी अपेक्षा आहे, असे नरेंद्र पवार यांनी नमूद केले.दरम्यान, वाढदिवसानिमित्त करण्यात आलेल्या १० हजार वृक्षलागवडीच्या उपक्रमामुळे राजकीय शुभेच्छांसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला आहे. भिवंडी लोकसभ मतदारसंघांमध्ये कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्याने हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात आला.

# नेपाळमधील पूरग्रस्तांसाठी भारताचा मदतीचा हात परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांच्याकडून आढावा बैठक

## 'शेजार प्रथम' धोरणांतर्गत ४७.५ टन मदत सामग्री रवाना; अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेसाठी नियंत्रण कक्ष स्थापन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



'शेजार प्रथम' धोरणाप्रती असलेली कटिबद्धता अधोरेखित करत भारताने नेपाळमधील पूर आणि भूस्खलनाच्या आपत्तीत पुन्हा एकदा 'प्रथम प्रतिसादकर्ता' म्हणून मदत पाठवली आहे. नेपाळमधील पूरग्रस्तांच्या साहाय्यासाठी केंद्र सरकारने २६ ऑगस्ट रोजी १० टन मानवतावादी मदत व आपत्कालीन औषधांची पहिली खेप काठमांडूला पाठवली. पाठोपाठ २७ ऑगस्ट रोजी भारतीय हवाई दलाच्या विशेष विमानाद्वारे ३७.५ टन मदत सामग्रीची दुसरी मोठी खेप रवाना करण्यात आली. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीबाबत 'एक्स' वर माहिती देताना डॉ. जयशंकर म्हणाले, नेपाळमधील पूरपरिस्थितीबाबत परराष्ट्र सचिव, मंत्रालयाची चमू आणि काठमांडू व बीजिंगमधील भारतीय दूतांसोबत आढावा बैठक घेतली. पूरग्रस्त भागात अडकलेल्या सर्व भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचा आणि आरोग्याचा आढावा घेण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू आहेत.

काठमांडूतील भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी पहिली मदत सामग्री नेपाळचे संस्कृती, पर्यटन व नागरी विमान वाहतूक मंत्री खड्ग राज पौडेल यांच्याकडे सुपूर्द केली. तर ३७.५ टनांची दुसरी खेप नेपाळचे विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवसंशोधन मंत्री महाबीर पुन यांच्याकडे सोपवण्यात आली. दूतावासातील सर्व अधिकाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नागरिकांच्या मदतीसाठी आपत्कालीन संपर्क क्रमांक जारी करण्यात आले आहेत.परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या तमिळनाडूतील २१ भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आहे. परिस्थितीवर चोवीस तास लक्ष ठेवण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयात विशेष नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे.

# महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाचा दिलदारपणा!

## नितांतसुंदर व्हिएतनामचे ३५ जणांना घडवले पर्यटन!

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत यांचे अनोखे दातृत्व सर्वपरिचित आहे. दुसऱ्यांची स्वप्नं पूर्ण करण्याचा जणू त्यांनी विडाच उचलला आहे. ज्यांनी केवळ विमान हा शब्द ऐकला आहे, अशा अनेकांना त्यांनी आजपर्यंत विमान प्रवास घडवला आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाच्या दिलदारपणामुळेच हायस्कूल आणि महाविद्यालयीन जीवनात लाभलेल्या सवंगड्यांसह त्यांनी चक्क ३५ जणांना १७ ते २५ ऑगस्ट असे आठ दिवस नितांतसुंदर अशा व्हिएतनामचे पर्यटन घडवले. परदेश प्रवास स्वप्नातही न पाहिलेल्यांना महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनामची सफर घडवली. त्यांचे परदेश प्रवासाचे स्वप्न पूर्ण केले. त्यामुळे चाकोरीबद्ध आयुष्य जगलेल्या सवंगड्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

ज्यांनी पासपोर्ट शब्द ऐकला होता, पण पासपोर्ट काढला नव्हता, त्यांनीही आठ दिवसांच्या पर्यटनात व्हिएतनामची राजधानी हनोई, त्यानंतर दा नांग, बाणा हिल, फु कॉक, हो ची मिन्ह शहर आणि मुंबई असा पाच वेळा विमान प्रवास केला आणि फाईव्हस्टार आणि थ्री स्टार हॉटेलमध्ये व्हिएतनाममध्ये राहाण्याची संधी दिली. त्यामुळे अशा सहकाऱ्यांना आकाश ठेंगणे झाले होते. क्रूझ सफर, तेथे जागोजागी असणारी बेटे, बाणा हिल येथे केबल कारमधून प्रवास आणि ते विहंगम दृश्य, दोन्ही हातावर साकारलेला पूल, तेथील उंचच उंच डोंगर रांगांतून जाणारी केबल कार, अनेक बेटांना जोडणारी जगातील सर्वाधिक लांबीची केबल कार, दा ची मिन्ह हे सुसज्ज शहर आणि व्हिएतनाम-अमेरिकादरम्यानच्या युद्धाची अंगावर काटा आणणारी दृश्य असणारे संग्रहालय आदींचे दर्शन एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना महेंद्रशेठ घरत यांनी घडवले. त्यामुळे एम. जी. ग्रुपचे सहकारी भारावले आहेत. यावेळी एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना भावना अनावर झाल्या होत्या. महेंद्रशेठ घरत यांच्यामुळेच आम्ही पहिल्यांदा विमानात बसलो. एवढेच नव्हे तर परदेशात जाऊ शकलो. त्यांनी प्रवासात जो आनंद दिला त्याला तोड नाही. त्यांनी स्वतःपेक्षा आमचीच काळजी व्हिएतनाम प्रवासात घेतली. उत्तम नियोजन आणि शिस्तप्रिय व्यवस्थापनाने प्रवासाचा आनंद द्विगुणित केला, अशा भावना पहिल्यांदाच परदेश प्रवास केलेल्या सवगंड्यांनी व्यक्त केल्या. परदेशात ३५ जणांना सांभाळणे आणि सांभाळून घेणे सोपे काम नव्हते, पण महेंद्रशेठ घरत यांनी ते लीलया पार पाडले. विशेष म्हणजे व्हिएतनाम पर्यटनासाठी असलेल्या सहकाऱ्यांच्या काही नातेवाईकांचे निधन झाले, काहींच्या घरी अडीअडचणी निर्माण झाल्या. कुणी गंभीर आजारी पडले, मात्र व्हिएतनाम प्रवासात महेंद्रशेठ घरत यांनी ज्यांच्या कुटुंबात दुःखद घटना घडली आहे, त्यांना मोलाचा आधार दिला. श्रद्धांजली वाहिली. तसेच गंभीर आजारी असणाऱ्यांवर व्यवस्थित आणि वेळेवर उपचार होतील, याची काळजी महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनाममधूनही घेतली. त्यामुळे मोठ्या मनाचा, दिलदार आणि दुसऱ्याला आनंद देण्याची वृत्ती, समोरच्याच्या चेहऱ्यावरील भावना वाचणारे महेंद्रशेठ घरत, हे सद्यपरिस्थितीत एकमेव नेते असल्याच्या भावनाही व्हिएतनाम पर्यटनातील सवंगड्यांनी व्यक्त केल्या.

# पुन्हा एकदा तंबी:फाइव्ह स्टार असो वा स्ट्रीट फूड नियम मोडल्यास कारवाई होणार-तुकाराम मुंढे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने आक्रमक मोहीम उघडली आहे. हॉटेल पंचतारांकित असो किंवा रस्त्यावरील स्ट्रीट फूड सेंटर, नियम मोडणाऱ्यांवर थेट आणि कठोर कारवाई केली जाईल. अन्न सुरक्षेच्या बाबतीत कोणालाही सवलत मिळणार नाही, असा स्पष्ट इशारा एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित वार्तालापात ते बोलत होते.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७०० हून अधिक आस्थापनांना आतापर्यंत नोटिसा बजावण्यात आल्या असून, सुमारे १०० आस्थापनांनी याविरोधात अपिले दाखल केली आहेत. कारवाई करताना आस्थापनेचे स्थान किंवा मालकाचा प्रभाव विचारात न घेता कायद्यानुसार निष्पक्ष पावले उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गणेशोत्सव आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर मिठाई तसेच खाद्यपदार्थांच्या विक्रीवर एफडीएची विशेष नजर असणार आहे. यासाठी वर्षभराचे विशेष कॅलेंडर तयार करण्यात आले असून, येत्या दोन दिवसांत तपासणीचे आदेश जारी केले जातील, असेही मुंडे यांनी या वेळी बोलताना सांगितले.राज्यामध्ये औषधांचा दर्जा आणि रक्तपेढ्यांच्या मानकांवर प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे. केवळ परवानाधारक संस्थांनाच रक्तदान शिबिरे आयोजित करता येतील, असे सांगताना जेनेरिक औषधांच्या दर्जाबाबत तक्रारी आल्यास कठोर पावले उचलली जातील, असा इशाराही या वेळी मुंढे यांनी बोलताना दिला.जिथे जिथे विनापरवाना, विना स्टँडर्ड, विदाऊट प्रोटोकॉल



असेल, तर ते नियमभंग करत आहेत. मग ते फेस्टिव्ह सीजन असो वा नसो, ते महत्त्वाचे नाही. प्रत्येक फूड बिझनेस ऑपरेटरने लायसन्स घेतले पाहिजे, रजिस्टर्ड पाहिजे, स्टँडर्ड रेग्युलेशनने ते पुरवले पाहिजे. ही रुटीन प्रोसेस आहे, फेस्टिव्ह सीजन म्हणून नाही, असेही मुंढे यांनी या वेळी सांगितले. या वेळी विविध प्रश्नांचीही उत्तरे दिली.शालेय परिसर : शाळांपासून ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर निर्बंध आणणाऱ्या नियमांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

पोषण आहार तपासणी: अंगणवाडी व शाळांमधील पोषण आहाराची तपासणी सुरू असून मुंबईतील एका केंद्राचा परवाना रद्द करण्यात आला आहे.डार्क किचन व गोदामे: ऑनलाइन फूड प्लॅटफॉर्म्स, डार्क किचन्स, गोदामे आणि मंत्रालयातील उपाहारगृहांचीही (११५ ठिकाणी) तपासणी करण्यात आली आहे.आपल्या कार्यपद्धतीबद्दल बोलताना मुंढे म्हणाले, मी सेलिब्रिटी नाही, फक्त एफडीए आयुक्त म्हणून महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याचे रक्षण करणे ही माझी बांधिलकी आहे. गेल्या तीन महिन्यांत प्रशासनाकडे ६० हजारांहून अधिक तक्रारी आल्या असून त्याआधारे कारवाईची व्याप्ती वाढवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.कारवाईनंतर अनेक रेस्टॉरंट्सकडून स्वतःहून सुधारणा आणि किचनचे नूतनीकरण केले जात आहे. काही रेस्टॉरंट्सनी ठराविक कालावधीनंतर स्वतःहून किचन बंद ठेवून स्वच्छता आणि सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. विविध शहर आणि ग्रामीण भागातून खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेत बदल झाला आहे. तेल, खाद्यपदार्थांचे रंग आणि दुधाच्या चवीत बदल झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## नायगांव येथे श्रावणी महोत्सव उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । प्रतिनिधी**

कळंब तालुक्यातील नायगांव येथील श्री नरसोबा मंदीरात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी परशुराम सेवा मंडळ नायगांवच्यावतीने नुकताच श्रावणी महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला, यावर्षी सर्व बृह्मवृदांनी एकत्रित येऊन आपले जुने जानवे काढून विधीवत पुजा अर्चना होम पुजा करुन नविन जानवे घातले, यावेळी नरसोबा मंदीरात अभिषेक करण्यात आला, याप्रसंगी पुरोहित अनिरुद्ध कुलकर्णी चिंचोली तसेच गजानन कुलकर्णी, विकास वाघ (कुलकर्णी), अमोल कुलकर्णी, अशोक कुलकर्णी,बालाजी गिलवरकर, विनायक वाघ,दत्तात्रय कुलकर्णी,उमेश जोशी, अमोल जोशी, श्रीनिवास कद्रे, भारत गिलवरकर,सौरभ कुलकर्णी, गणेश जोशी, वेदांत वाघ अविनाश गिलवरकर,संजय वाघ,हनुमंत गिलवरकर, गिरीश जोशी, सतीश कद्रे, गोविंद कुलकर्णी, नारायण गिलवरकर,रविंद्र वाघ, बाळासाहेब जोशी, दासोपंत जोशी,अरुण कद्रे, आदी सर्व बृह्मवृंद, परशुराम सेवा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## केज येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांच्या तडकाफडकी बदलीला न्यायालयाचा स्थगिती आदेश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महावितरण कंपनीच्या केज येथील कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांच्यावर राजकीय दबावापोटी करण्यात आलेली तडकाफडकी बदली उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखेर स्थगित करण्यात आली असून, त्यांना पुन्हा केज येथे रुजू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वीज चोऱ्यांवर धडक कारवाई केल्यामुळे काही स्थानिक पुढाऱ्यांच्या दबावातून ही बदली करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

**कर्तव्यकठोर भूमिकेमुळे वीज चोरांवर वचक**

श्रीमती शितल सय्यद यांनी केज येथे कनिष्ठ अभियंता म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर महावितरणचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि वीज गळती रोखण्यासाठी कडक पावले उचलली होती. त्यांच्या कार्यकाळात परिसरातील मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली वीज चोरी उघडकीस आणण्यात आली. विशेषतः काही राजकीय नेते, बडे व्यावसायिक तसेच मोठ्या बांधकामांच्या ठिकाणी सुरू असलेली अनधिकृत वीज



चोरी त्यांनी शोधून काढून दंडात्मक कारवाई केली होती. या प्रामाणिक व धडाकेबाज कामगिरीमुळे महावितरणचा महसूल वाढण्यास मोठी मदत झाली होती, तर वीज चोरांचे धाबे दणाणले होते.

**राजकीय दबावातून तडकाफडकी बदली**

प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत असताना काही राजकीय नेत्यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांवर आणि शाळांवर वीज चोरीची कारवाई करणे संबंधित नेत्यांना खपले नाही. या कारवाईचा राग मनात धरून काही स्थानिक राजकीय पुढाऱ्यांनी वरिष्ठांकडे संगनमत करून शितल सय्यद यांच्याविरोधात खोट्या तक्रारी केल्या. या तक्रारींची कोणतीही खातरजमा किंवा चौकशी न करता वरिष्ठांनी तातडीने त्यांची केज येथून अन्यत्र तडकाफडकी बदली केली.

**वरिष्ठांकडून दाद न मिळाल्याने न्यायालयाचे दार**

आपल्यावरील अन्यायाबाबत श्रीमती शितल सय्यद यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रीतसर दाद मागितली आणि वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, राजकीय दबाब अतिशय तीव्र असल्यामुळे वरिष्ठांनी त्यांची तक्रार ग्राह्य धरली नाही आणि न्याय मिळण्याचे सर्व मार्ग बंद झाले. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांना न्याय मिळवण्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागले.

न्यायालयाकडून दिलासा आणि न्याय

न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर प्रशासकीय पातळीवर झालेली मनमानी आणि राजकीय दबावाखाली केलेली कारवाई न्यायालयाच्या निदर्शनास आली. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून न्यायालयाने शितल सय्यद यांच्या बदलीला स्थगिती दिली आहे. या न्यायालयाच्या दणक्यामुळे कर्तव्यकठोर अधिकाऱ्यांवर अन्याय करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या मनसुब्यांना मोठा धक्का बसला असून, सचोटीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये पुन्हा विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. न्यायालयाच्या या निकालानंतर श्रीमती शितल सय्यद पुन्हा एकदा केज येथे आपल्या पदावर रुजू झाल्या आहेत.

## शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब व आगाज फाऊंडेशनच्या वक्तृत्व स्पर्धेत केजच्या मुस्कान पठाणचे यश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय,केज येथील विज्ञान शाखेची विद्यार्थिनी मुस्कान पठाण हिने कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब व आगाज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केले आहे.या पारितोषिकाचे स्वरूप स्मृती चिन्ह,तीन हजार रुपये व प्रमाणपत्र असे आहे.मुस्कान पठाण च्या या यशाबद्दल छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगरच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सौ.अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. अनिल किर्दत, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.सी.एन. सोळंके यांनी अभिनंदन केले आहे.या स्पर्धेत इतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.या विद्यार्थ्यांना डॉ.सौ.आशा बोबडे, डॉ.सौ.आर.व्ही.गंगणे यांनी मार्गदर्शन केले.

## जिवाची वाडी येथील युवक युवराज चौरे यांचे विजेच्या धक्क्याने दुःखद निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाची वाडी येथील युवराज आसाराम चौरे वय २२ वर्ष यांचे दि. २८ आगस्ट रोजी विजेचा धक्का लागुन शॉटसर्कीटने दु:खद निधन झाले.गावातील नारद स्वामी मंदीरात दि.२८ आगस्ट २०२६ रोजी पहाटे ४-०० वाजता गोदावरी नदीचे पाणी देवाला घालण्या साठी गेले असता शॉट सर्कीटने जोरातविजेचा धक्का बसला खाजगी दवाखान्यात नेण्या पूर्वीच त्यांचे निधन झाले.अंत्यविधी १२-३० वाजता काळअंबा वस्ती येथील शेतात करण्यात आला युवराज चौरे हा युवक शांत,संयमी व धार्मिक प्रवृत्तीचा असल्याने श्रावण महिना चालू असल्याने नारद स्वामी मंदिरामध्ये गंगा गोदावरी नदीचे पाणी आणुन नारद स्वामी मंदिरात पुजा करत होते.शार्टसर्किटमुळे एका युवकाला आपला जीव गमवावा लागला आहे.या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली विडा बिट अंमलदार उमेश आघाव हे पुढील तपास करीत आहेत. दरम्यान या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.



## खा.बजरंग सोनवणे यांच्या कडून दिवंगत महादेव मुंडे यांच्या पत्नीला न्यायाची ग्वाही गोरक्षनाथ टेकडी पायथ्याशी बांधली राखी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



गोरक्षनाथ टेकडीच्या पायथ्याशी एका अत्यंत भावनिक वातावरणात स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या पत्नीने खासदार बजरंग सोनवणे यांना राखी बांधून भाऊ - बहिणीच्या पवित्र नात्याला उजाळा दिला.रक्षाबंधन आणि या भेटीच्या औचित्याने त्यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या समोर बहिणीच्या नात्याने आपल्या अंतःकरणा तील भावना व्यक्त केल्या.मागील काही काळापासून सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर,आपल्या पाठीशी एक खंबीर भाऊ म्हणून खासदार उभे राहतील,अशी आशा त्यांनी या वेळी व्यक्त केली.बहिणीची ही भावनिक हाक ऐकून खासदार बजरंग सोनवणे देखील गहिवरले.या प्रसंगी बोलताना खासदार बजरंग सोनवणे यांनी अत्यंत संवेदनशीलतेने आपल्या भावना व्यक्त केल्या.'माझ्या या बहिणीच्या न्यायासाठी मी सदैव तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन.तिला पूर्ण न्याय मिळवून देण्यासाठी मी वैयक्तिक आणि राजकीय पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करेन,असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी दिला.गोरक्षनाथ टेकडीच्या पायथ्याशी पार पडलेला हा सोहळा केवळ रक्षाबंधनापुरता मर्यादित न राहता, अन्यायाविरुद्धच्या लढ्यात बहिणीला भावाकडून मिळालेल्या भक्कम आधाराचा आणि आश्वासनाचा क्षण ठरला.या प्रसंगी स्थानिक नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

### डॉ.बी.जे.हिरवे,प्रा.संतोष राऊत यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । रमेश गुळभिले**

केज येथील ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसमध्ये ऑलिम्पियाड, अक्षर गंगा व स्कॉलरशिप परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रा. डॉ. बाबासाहेब हिरवे, प्रा. संतोष राऊत व जगताप सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शौर्य घोळवे, रुद्राक्ष गिरी, पार्थवी जगताप यांच्यासह विविध परीक्षांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे यश हे मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याचे फलित असल्याचे मान्यवरांनी सांगितले.या यशामागे संचालिका सौ. प्रीती कलढोणे, सौ. पूनम कावळे व सौ. नेहा मॅडम यांचे मार्गदर्शन



लाभले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. कावळे यांनी केले, तर आभार प्रा. ज्ञानेश कलढोणे यांनी मानले.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव तळोदा मध्ये भक्तिभावाने व उत्साहात संपन्न

## अमेरिकेतून उच्च शिक्षण घेऊन परतलेल्या शिवम बोरदेसह गुणवंतांचा गौरव!

दैनिक वादळ वाता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

साळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर महाराज यांचा जन्मोत्सव तळोदा येथे अत्यंत भक्तिमय, धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांनी मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. अध्यात्म, संस्कृती आणि सामाजिक एकोप्याच्या सुंदर संगमात पार पडलेल्या या सोहळ्यात अमेरिकेतून उच्च शिक्षण घेऊन परतलेल्या तरुणाचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम भगवान श्री जिव्हेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, पोथी वाचन आणि सत्यनारायण पूजनाने करण्यात आली. यानंतर देवकी प्रसाद साळी समाजभवनाचे भूमिपूजन गुरुप्रसाद लांबोळे यांच्या हस्ते संपन्न झाले. ज्येष्ठ समाजबांधव मोहन साळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास तळोदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पॅनल प्रमुख योगेश चौधरी, नगरसेवक कल्पेश चौधरी यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर आणि ज्येष्ठ मार्गदर्शक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा सोनवणे यांनी केले.प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमेच्या पूजनानंतर भगवान श्री जिव्हेश्वर महाराजांची आरती व पारंपरिक पाळणा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. अविनाश बोरदे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची पार्श्वभूमी विशद केली.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते



शिवम अविनाश बोरदे याचा सत्कार! ड्रोन व विमान क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील रिझोना राज्यातील फिनिक्स येथे दीड वर्षांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून भारतात परतलेल्या शिवमच्या यशाने साळी समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. उपस्थितांनी त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल भरभरून कौतुक केले.

यावेळी साळी समाज जीवनगौरव पुरस्कार कै. इच्छारामदादा यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आला. त्यांच्या कार्याचा परिचय डॉ. नितीन साळी यांनी करून दिला, तर सुरेश साळी यांनी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. लहान बालकलाकारांनी सादर केलेली गणेश वंदना, भगवान श्री जिव्हेश्वर महाराजांच्या कथेचे नाट्यरूपांतर, आकर्षक भाषणे आणि श्लोक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय यशाबद्दल गुणवंतांचाही गौरव करण्यात आला. यात बारावीच्या परीक्षेत तळोदा कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल निधी सोनवणे, तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल अपूर्वा साळी व हिमानी बोरदे यांचा सत्कार करण्यात आला. नंदुरबार जिल्हा साळी समाज मंडळाचा संदेश वैशाली महेश बोरदे यांनी वाचून दाखवला.कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. नितीन साळी यांनी आभार मानले. धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकता आणि गुणवंतांच्या गौरवमय सत्कारामुळे हा जन्मोत्सव तळोदा शहरात एक आनंददायी व स्मरणीय सोहळा ठरला.

# सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव जाधव सरांच्या सहस्त्र चंद्र दर्शन सोहळ्यानिमीत्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । विजय डावरे**

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाच्या उभारणीत महत्वाचा वाटा असलेले, स्थपनेपासून विद्यार्थी प्रिय गणिताचे शिक्षक म्हणुन ओळख असलेले सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव साहेबराव जाधव यांच्या ८१ व्या वाढदिवसाच्या तथा सहस्त्र चंद्र दर्शन सोहळ्यानिमीत्त श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



या वेळी स्वतः जाधव गुरुजी सह कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर , पर्यवेक्षक कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर इत्यादी उपस्थित होते. यावेळी माता सरस्वती चे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते राखी प्रदर्शनीचे उदघाटन करण्यात आले. यावेळी जाधव गुरुजींचे कुटुंबीय जेष्ठ चिरंजीव अविनाश जाधव सर, प्रा विकास जाधव सर, विनोद जाधव, कन्या सौ विजया शेजुळ (जाधव) , नात कु. अनुष्का, कु. अनुजा इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु अनुजा जाधव यांनी केले आभार रोहित खिंडरे यांनी मानले तर सुत्रसंचालन कमलाकर झोडगे सर यांनी केले.

# ई–पीक पाहणी नोंदणी १०० टक्के मोफत; अफवांवर विश्वास ठेवू नये

## तलाठी राजीव सानप व कृषी सहायक सचिन भालशंकर यांचे स्पष्टीकरण

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

पालसिंगण व परिसरात ई–पीक पाहणी नोंदणीबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर तलाठी राजीव सानप व कृषी सहायक सचिन भालशंकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

ई–पीक पाहणीची नोंदणी शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे मोफत असून कोणतेही शुल्क देण्याची गरज नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

ई–पीक पाहणीसाठी नियुक्त सहाय्यकांना शासनाकडून प्रति गट १० रुपये अधिकृत मानधन मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सहाय्यकांना कोणतेही पैसे देऊ नयेत. तसेच 'माझी




शेती, माझा सातबारा, मीच नोंदवणार माझा पीक पेरा' या धोरणानुसार शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवरून पीक नोंदणी करण्याचा अधिकार कायम आहे.

पीक विमा, सानुग्रह मदत व कृषी कर्जासह विविध शासकीय योजनांसाठी ई–पीक पाहणीची नोंद महत्त्वाची असल्याने शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करावी. तांत्रिक अडचणी असल्यास प्रशासनाने त्या दूर करून स्वयं–नोंदणी प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांनुसार ई–पीक पाहणी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मेहनत,जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर सतीश कांबळे यांची शिक्षकपदी निवड

## गावच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी केला सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । विजय डावरे**

शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगावचे सुपुत्र सतीश महादू कांबळे यांची सोलापूर जिल्हा परिषद येथे प्राथमिक शिक्षकपदी निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल ब्रह्मगाव ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सतीश कांबळे यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासात सातत्यपूर्ण प्रयत्न करत शिक्षक होण्याचे ध्येय साध्य केले. स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवत त्यांनी प्राथमिक शिक्षकपदाला गवसणी घातली. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांमध्ये आनंदाचे



वातावरण आहे.

मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशाचे नवे शिखर गाठणाऱ्या सतीश कांबळे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशामुळे ब्रह्मगावच्या शैक्षणिक क्षेत्रातही अभिमानाची भर पडली आहे. यशाबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते नितीन नाईकनवरे, ऊसतोड कामगार सा. प्रा. अध्यक्ष अनिल राधे कांबळे, माजी नगरसेवक शिवाजी सुतार, पोलीस पाटील मधु कांबळे, ब्रह्मगावचे सरपंच नारायण भले, उपसरपंच गंगाराम शेंडगे, सदस्य हनुमान सरवदे, मुख्याध्यापक गवळी सर, सुधाकर कांबळे, रमेश जाधव,थोरात महाराज, बंडू लोखंडे, कचरू कांबळे, किरण थोरात,अशोक थोरात, विलास लोखंडे, सचिन गायकवाड, किरण कांबळे, हरिभाऊ शिरसागर, अजय अवघडे, मनोज कांबळे, बालाजी कांबळे, किरण कांबळे, विक्रांत कांबळे, शहादेव कांबळे, मच्छिंद्र कांबळे, दिगंबर कांबळे, सौरभ कांबळे व सर्व गावकरी उपस्थित होते.

# नेशन बिल्डर अवॉर्डसाठी प्रस्ताव पाठविण्याचे रोटरी क्लब गेवराईचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

सेवा,प्रामाणिकपणा आणि दातृत्व या विचाराने सुरू झालेल्या रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने यावर्षासाठी गेवराई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांकडून राष्ट्र निर्माण पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड) साठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

गेवराई येथे एक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लबचे हे दुसरे वर्ष आहे. गेल्यावर्षी तालुक्यातील संतोष कोठेकर, महेंद्र मवाडे, विष्णू जाधव, दक्षा वानखेडे, राम चौधरी या आदर्श शिक्षकांना २०२४–२०२५ या वर्षाचा नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करण्यात आला होता. रोटरी क्लबचा मानाचा पुरस्कार मिळावा म्हणून तालुक्यातून अक्षरशः प्रस्तावांचा पाऊस पडला होता. रोटरी क्लबने यावर्षीही ५ शिक्षकांना पुरस्कार देण्यात येणार आहे. भव्य समारंभात सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, महावस्त्र, मानपत्र लवकरच मान्यवरांच्या



हस्ते प्रदान करण्यात येईल. रोटरी क्लबने पुरस्कार निवड समिती गठित केली असून याकरिता तालुक्यातील शिक्षकांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव दि.४ सप्टेंबर २०२६ पर्यंत धर्मराज करपे, सचिव, रोटरी क्लब ऑफ गेवराई,द्वारा. संतोष कोठेकर निवास, बेद्रे लॉन्ससमोर, कोल्हेर रोड,गेवराई जि. बीड (४३११२७) या पत्त्यावर पाठवावेत अथवा प्रत्यक्ष आणून द्यावेत. अधिक माहितीसाठी रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष रो. गणेश कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सुकळी ज.येथे तंटामुक्त अध्यक्ष पदी डॉ.अयुबखां पठाण यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**उमरखेड । प्रतिनिधी**

गावातील तंटे व वाद सामोपचाराने मिटवून गावात शांतता, सामाजिक सलोखा आणि आपसी बंधुभाव कायम राखण्याच्या उद्देशाने आयोजित ग्रामसभेत तंटामुक्त समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली. ग्रामस्थांच्या एकमताने झालेल्या या निवडीमुळे गावातील सामाजिक एकोपा अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.

सरपंच सौ. श्रद्धा ज्ञानेश्वर बोके यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. यावेळी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी डॉ. अयुबखां पठाण, उपाध्यक्षपदी श्री. लक्ष्मीकांत उर्फ बाळू गंगात्रे, सचिवपदी श्री. ओंकार जाधव, तर सहसचिवपदी शे. निसार शे. बशीर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

समितीच्या सदस्यपदी श्री. कैलासराव वानखेडे, श्री. सूर्यभान पाटील वानखेडे, श्री. संतोषराव वानखेडे, श्री. लक्ष्मणराव कदम, श्री. सुनील खेडकर, श्री. गजानन वानखेडे, श्री. अनंता नरवाडे, श्री. अरविंद बडेराव, श्री. गणेश राठोड आणि शे. मोहम्मद शे. हुसेन यांची निवड करण्यात आली.

गावातील नागरिकांमध्ये आपसी संवाद वाढविणे, किरकोळ वादांना वेळीच सामोपचाराने मार्गी लावणे, सामाजिक सलोखा अबाधित ठेवणे तसेच गावात शांततामय वातावरण निर्माण करण्यासाठी नवनिर्वाचित समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ग्रामस्थांनी एकमताने केलेली ही निवड गावातील एकजुटीचे प्रतीक असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

या ग्रामसभेस श्रीमती संगीताताई दशरथराव वानखेडे, माजी पंचायत समिती सदस्य, श्री. ज्ञानेश्वर कनवाळे, सोसायटी अध्यक्ष, श्री. मारोतराव वानखेडे, माजी सरपंच, श्री. चुन्नुमियाजी काजी, माजी सरपंच तसेच शे. बशीर भाई, माजी उपसरपंच यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.नवनिर्वाचित तंटामुक्त समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. गावातील शांतता व सलोखा टिकविण्यासाठी समितीने एकजुटीने आणि निष्पक्षपणे काम करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077